पुढारी

# भारतीय विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षणाच्या अनेक संधी : राजगुरू

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

आज शिक्षणातील स्पर्धात्मक वातावरणामध्ये भारतीय विद्यार्थ्यांना परदेशातील शिक्षणाच्या अनेक संधी उपलब्ध असून या संधीचा लाभ घेण्यासाठी परदेशी शिक्षणासाठीची प्रक्रिया समजावून घेणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन सलील राजगुरू यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र व आजीवन अध्ययन व विस्तार विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'परदेशी शिक्षणातील संधी व प्रक्रिया' या विषयावरील एकदिवसीय व्याख्यानमालेमध्ये ते बोलत होते.

कार्यक्रमामध्ये राज्यभरातून ऑनलाईन २५२ विद्यार्थी सहभागी झाले होते. विभागाचे प्र. संचालक प्रा. डॉ. ए. एम. गुरव उपस्थित होते. महेश चव्हाण यांनी स्वागत केले. प्रमुख पाहुण्यांची ओळख अतुल ऐतावडेकर यांनी करून दिली.

पुढारी

# देशाच्या सर्वांगीण विकासासाठी महिलांचे सामाजिक, आर्थिक समावेशन अत्यावश्यक : आर. मुकुंदन

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** देशाच्या सर्वांगीण सामाजिक, आर्थिक प्रगतीसाठी ५० टक्के लोकसंख्या असलेल्या महिला वर्गाला सर्वच क्षेत्रांतील मुख्य प्रवाहात बरोबरीने सामावून घेण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन टाटा केमिकल्सचे व्यवस्थापकीय संचालक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी आर. मुकुंदन यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित विशेष ऑनलाईन व्याख्यानमालेत 'भारतातील संवर्धनीय शाश्वतता व डिजिटल संधींचे नवनिर्माण' विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. अर्थशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. ज्ञानदेव तळुले यांनी प्रास्ताविक केले. डॉ. यशवंतराव थोरात यांनी परिचय करून दिला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

10 SEP 2021
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठ एनआयआरएफच्या रँकिंगमध्ये

## सलग तीन वर्षे १०१ ते १५० व्या क्रमवारीत

प्रतिनिधी
कोल्हापूर



केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयातर्फे देशात राबविण्यात आलेल्या 'नॅशनल इन्स्टिट्युशनल रँकिंग फेमवर्कच्या (एनआयआरएफ) क्रमवारीत शिवाजी विद्यापीठाने देशात १०१ ते १५० दरम्यानचे स्थान मिळविले आहे. राष्ट्रीय क्रमवारीत सलग तीनवेळा याच स्थानावर शिवाजी विद्यापीठ आहे, अशी माहिती अंतर्गत गुणवत्ता कक्षाचे संचालक डॉ. एम. एस. देशमुख यांनी दिली.

केंद्रीय मनुष्यबळ मंत्रालयातर्फे 'टॉप-१००' विद्यापीठे व शैक्षणिक संस्था यांची क्रमवारी गुरुवारी जाहीर करण्यात आली. विविध खासगी संस्था विविध प्रकारच्या निकषांवर शैक्षणिक संस्थांच्या निरनिराळ्या क्रमवारी प्रसिद्ध करीत असतात. तथापि, या पद्धतीमध्ये सुसूत्रता आणण्याच्या दृष्टीने भारत सरकारच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाने २९ सप्टेंबर २०१५ रोजी 'नॅशनल इन्स्टिट्युशनल रँकिंग फ्रेमवर्क'ची निर्मिती केली.

पान ६ पहा

## भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी राज्यात आठव्या स्थानी

एनआयआरएफच्या क्रमवारीत भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी, कोल्हापूरने देशात ४९ वे तर राज्यात ८ वे स्थान मिळविले आहे. राष्ट्रीय क्रमवारीत सलग सहावेळा स्थान पटकाविलेले शिवाजी विद्यापीठ संलग्नित एकमेव फार्मसी महाविद्यालय आहे. सर्व शैक्षणिक संस्थांचे समान निकषांवर आधारित मूल्यांकन व्हावे. अद्यापन-अध्ययन प्रक्रिया, संशोधन व व्यावसायिक कृतीशिलता, विद्यार्थ्यांचे उत्तीर्णतेचे प्रमाण, समाजातील वंचित घटकापर्यंत शिक्षण पोहचविण्याचे प्रयत्न आदी निकषांवर ही क्रमवारी आधारित आहे.

भारती विद्यापीठाचे संस्थापक डॉ. पतंगराव कदम यांच्या प्रेरणेने डॉ. शिवाजीराव कदम, विश्वजीत कदम, एच. एम. कदम आदींच्या पाठबळामुळे हे यश मिळाले आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. एच. एन. मोरे यांनी केले.

## शिवाजी विद्यापीठ एनआयआरएफच्या रँकिंगमध्ये

पान १ वरून

अध्यापन-अध्ययन प्रक्रिया, संशोधनपर व व्यावसायिक कृतीशीलता, विद्यार्थ्यांचे उत्तीर्णतेचे प्रमाण, महिलांसह विविध वंचित समाजघटकांपर्यंत शिक्षण पोहोचविण्याचे प्रयत्न आणि विद्यापीठाशी संबंधित विविध घटकांशी संवाद व समन्वय या निकषांवर ही क्रमवारी आधारित आहे. विद्यापीठे व महाविद्यालये यांच्यासाठीच्या क्रमवारीखेरीज अभियांत्रिकी, व्यवस्थापन, फार्मसी, आर्किटेक्चर या क्षेत्रातील विशेष शैक्षणिक संस्थांचीही स्वतंत्र क्रमवारी जाहीर करण्यात आली आहे.

तरूण भारत

# नवसंकल्पनांना व्यासपीठ मिळवून देणार

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाने नवोपक्रम, नवसंशोधन व सहचर्य केंद्राची स्थापना केलेली आहे. या केंद्रांतर्गत एसयुके रिसर्च अँड डेव्हलपमेंट फौंडेशन या सेक्शन आठ कंपनी कायदा २०१३ नुसार रितसर नोंदणी केली आहे. कोणाकडे नाविन्यपूर्ण कल्पना असतील तर त्याला शिवाजी विद्यापीठातील हे केंद्र योग्य व्यासपीठ मिळवून देणार आहे, हा प्रोजेक्ट विद्यापीठाच्या **sciil@unishivaji.ac.in** या ईमेल आयडीवर पाठवावाा, असे आवाहन केंद्राचे संचालक डॉ. एम. एस. देशमुख यांनी केले आहे. शिवाजी विद्यापीठाकडे पाठवलेला एखादा प्रोजेक्टच्या कल्पनांचे अधिकार संबंधीत व्यक्तीला राहणार आहेत. तरी शिवाजी विद्यापीठाकडे नवनवीन कल्पना पाठवाव्या, असे आवाहन डॉ. देशमुख यांनी केले आहे.